MHKO030158582025

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ०४.०८.२०२५ |
| नोंदणी दिनांक | ०७.०८.२०२५ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९.०७.२०२६ |
| कालावधी | ०० व. ११ म. ०५ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्रमांक ३) कोल्हापूर, यांच्या न्यायालयात**
**(पीठासन अधिकारी : अ. वि. मुसळे)**
(घोषीत दिनांक.०९.०७.२०२६)

**नियमित फौजदरी खटला क्रं.१२१०/२०२५,** **निशाणी क्रं.२३.**
**गु.र.नं. I-३९४/२०२५ पोलीस ठाणे राजारामपुरी.**

| | |
|---|---|
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती एस.व्ही. कदम, |
| आरोपी | **१. रोहित सुरेश कदम**<br>वय - २३ वर्ष, व्यवसाय- गंवडीकाम,<br><br>**२. विजय सुरेश कदम**<br>वय - २१ वर्ष, व्यवसाय- गंवडीकाम,<br>दोघे रा. जुना कंदलगाव नाका,<br>सुभाषनगर, कोल्हापूर. |
| आरोपी तर्फे विधीज्ञ | श्री.ए.एम. चव्हाण. |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०४.०६.२०२५ |
| पहिली खबर दिनांक | ०५.०६.२०२५ |
| दोषारोपत्राचा दिनांक | ३०.०६.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन | निरंक |

| | |
|---|---|
| ठेवल्याचा दिनांक | |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०९.०७.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम भा.ना.सु.संहिता-२०२३ चे कलम ४६८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहित सुरेश कदम | ०६.०६.२०२५ | ०६.०६.२०२५ | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(२)(३), ३५२, ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २. | विजय सुरेश कदम | ०६.०६.२०२५ | ०६.०६.२०२५ | --''-- | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग-क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| अ.सा.क्रं.१ | विजय दामोदर भोसले | फिर्यादी |
| अ.सा.क्रं.२ | विकास दामोदर भोसले | साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | मु.क्र.९२/२०२५ | एक तलवार एका बाजुस धार असलेली लोखंडी गार्ड मुठीसह ४५ इंच लांबीची, मुठ १० इंच लांबीची असलेली |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०९ जुलै, २०२६ रोजी घोषित)

आरोपींविरुध्द् भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(२)(३), ३५२, ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यासाठी सदरचा खटला चालविण्यात आला.

२. **अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन खालील प्रमाणे आहेः**

दिनांक ०४.०६.२०२५ रोजी रात्री २२.३० वाजेच्या सुमारास २८३२, बी वॉर्ड, खनभाग, जवाहरनगर, कोल्हापूर या ठिकाणी फिर्यादीने आरोपी क्र.१ यास मोटरसायकल हळु चालव असे म्हटले होते व त्याचा राग मनात धरुन फिर्यादी व त्यांचा भाऊ विकास भोसले यास आरोपींनी शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ यास फोन करुन बोलावून घेतले व तो तलवार घेवून आला. फिर्यादीचा भाऊ हा वाद सोडविताना आरोपी क्र.२ हा तलवार घेवून त्याच्या अंगावर धावून गेला. त्यावेळी आजुबाजूचे लोक जमा झाल्याने दोन्ही आरोपी गाडीवर बसुन पळून गेले व फिर्यादी व साक्षीदार यांना रागाने बघत शिवीगाळ व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे, फिर्यादीने पोलीस स्टेशन राजारामपुरी येथे तक्रार दिली.

३. सदर तक्रारीवरुन आरोपीविरुध्द राजारामपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. पोलीसांनी गुन्हा क्र.३९४/२०२५ प्रमाणे आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(२)(३), ३५२, ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल केला. गुन्हयाचा तपास पोलीस

नाईक ब.नं.२१९५, पो.स्टे. राजारामपुरी श्री.उमेश व्ही. कांबळे यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. घटनास्थळ पंचनामा केला. तसेच पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री.पी.पी.आवडे यांनी मुददेमाल जप्ती पंचनामा तयार केला. आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द कलम ३५१(२)(३), ३५२, ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३ सह ४, २५ भारतीय हत्यार कायदा कलम अन्वये निशाणी ११ नुसार आरोपनिश्चिती केले व त्यांना गुन्हयांचा तपशील मराठी भाषेत समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द पुरावा आढळून आला नसल्यामुळे भा.ना.सु.सं. कलम ३५१ प्रमाणे आरोपींचे जबाब घेण्यात आले नाही.

५. माझे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे आणि त्यावरील माझे निष्कर्ष हे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०४.०६.२०२५ रोजी रात्री २२.३० वा च्या सुमारास २८३२, बी वॉर्ड, खनभाग, जवाहरनगर, कोल्हापूर येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांना वाईटवंगाळ शिवीगाळ करुन त्यांचा पदन्यास केला व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५२ सह ३(५) प्रमाणे गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २. | वर नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी, आरोपींनी संगनमताने फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा केला व त्यायोगे भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२)(३) सह ३(५) प्रमाणे गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळेस व ठिकाणी, आरोपींनी संगनमताने फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न हा धारदार शासत्रानी केला त्या धारदार शास्त्रांमध्ये तलवार याचा वापर केला व त्यायोगे | |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह कलम २५ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

## कारणमिमांसा

६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी (निशाणी क्र.२०) व साक्षीदार (निशाणी क्र.२१) यांची साक्ष नोंदविण्यात आली. आरोपी व फिर्यादी यांच्यामधील तडजोड पुरसीस (निशाणी क्र.१९) वर दाखल केली.

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :-**

७. वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्याचे विश्लेषण एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

८. फिर्यादी यांनी त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना कधी व काय घडली हे त्यांना आठवत नाही. तसेच त्यांना कोणीही मारहाण केली नसल्याचे कथन केले आहे. फिर्यादीने आरोपीविरुध्द राजारामपुरी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती हे मान्य केले आहे. परंतु फिर्याद मधील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे.

९. फिर्यादी फिर्यादीतील मजकूराशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरून अभियोग पक्षास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु, फिर्यादीने फिर्यादमधील आरोप नाकारले आहेत. आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याचे सांगितले आहे.

१०. साक्षीदार विकास (अ.प.क्र.२, क्र.२१) यांनी त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना कधी व काय घडली हे त्यांना आठवत नाही. तसेच त्यांना कोणीही मारहाण केली नसल्याचे कथन केले आहे. तसेच, ते आरोपींना ओळखु

शकणार नाही असे कथन केले. त्यांच्या जबाबामधील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे.

११. साक्षीदार यांनी त्यांच्या मजकूराशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या विनंतीवरून अभियोग पक्षास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु, साक्षीदाराने जबाबामधील आरोप नाकारले आहेत. आरोपींसोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली असल्याचे सांगितले आहे.

१२. फिर्यादी व आरोपी यांनी (निशाणी क्र.१९) कडे पुरसिस दाखल करुन त्यांच्यात तडजोड झाल्याचे नमूद केले. उभय पक्षकारांमधील वाद मिटले असल्याने फिर्यादीने फिर्यादीतील मजकुराशी विसंगत कथन केले आहे.

१३. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द होण्याकरीता कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत**

१४. सबळ पुराव्या अभावी आरोपी हा निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे जामिनाची पूर्तता केली आहे. त्यामुळे, वर चर्चिलेल्या मुद्याच्या निष्कर्षावरुन मुद्दा क्र.४ च्याबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ रोहित सुरेश कदम व आरोपी क्र.२ विजय सुरेश कदम यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) नुसार या भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१(२)(३), ३५२, ३(५) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ या गुन्हयांतून निर्दोष मुक्त करण्यात आले. |

| | |
|---|---|
| २. | पोलीस उपनिरीक्षक, पो.ठा. राजारामपुरी, कोल्हापूर यांना आदेशीत करण्यात येते की, मु.र.नं.९२/२०२५ मधील जप्त असलेली एक तलवार ज्याच्या एका बाजुस धार असलेली लोखंडी गार्ड व मुठीसह ४५ इंच लांबीची, मुठ १० इंच लांब, ही अपीलाचा कालावधी संपुष्टात आल्यावर कायदेशीररित्या नष्ट करण्यात यावी. |
| ३. | आरोपी यांचे बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात आला. त्यांना मुक्त करण्यात आले. |
| ४. | आरोपींना आदेशीत करणेत येते की, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/- इतक्या रकमेचा वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात सही करुन घोषित करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.09 17:18:15 +0530

दिः ०९/०७/२०२६

(अ. वि. मुसळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.३), कोल्हापूर.

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Stenographer : | Shri. M.R. Khatib |
| Court | J.M.F.C. Court No.03, Kolhapur. |
| Date | 09/07/2026. |
| E-signed by the presiding officer on | 09/07/2026. |
| uploaded on | 09/07/2026. |